# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax २३५६८२०

http://www.dteau.org

roaurangabad.dte@gmail.com


<u>अतितात्काळ</u>

जा.क्र.विकाऔ/आस्था-३/२०१३/ ७८६८

दिनांक :- 15 OCT 2013

प्रति,

प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय / शासकीय औषधनिर्माणशास्त्र महा., औरंगाबाद
उपसचिव, तंत्रशिक्षण मंडळ प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद,जालना,अंबड,जिंतूर,हिंगोली,नांदेड,बीड,उस्मानाबाद
पु.ला.लातूर, निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर

**विषयः**- मागासवर्गीय प्रवर्गातील कर्मचा-याबाबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी व जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास पुढील कार्यवाहीबाबत.

**संदर्भः**-१) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. बीसीसी-२०१२/ प्र.क्र.३३२/१२/१६-ब दि. ३०.७.२०१३

२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र. १ /आढावा बैठक/२०१३/ २१९ दि. ५.१०.२०१३

उपरोक्त संदर्भिय विषयी आपणास कळविण्यात येते की, शासन सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे सक्तीचे असल्यामुळे जातवैधता प्रमाणपत्र पडताळणीसाठी प्रस्ताव समितीकडे सादर करण्याची दिनांक ३०.९.२०१३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

दि. १५-६-१९९५ पुर्वी शासन सेवेत लागलेल्या व दि. ३०-६-२०१३ पर्यंत सेवानिवृत्त झालेल्या अनु. जमातीच्या कर्मचा-यांनी त्यांचे मुळ जात प्रमाणपत्र कार्यालय प्रमुखाकडे दि. ३०-९-२०१३ पर्यंत जमा करुन पोचपावती घेणे बंधनकारक होते या कार्यालयाचे दि. २१-८-२०१३ च्या परिपत्रकान्वये तसे कळविण्यात आलेले आहे. तसेच दि. १५-६-१९९५ पुर्वी शासन सेवेत लागलेल्या कार्यरत कर्मचा-यांनी अनु. जमातीचा दावा सोडावयाचा असल्यास त्यांचे मुळ अनु. जमाती प्रमाणपत्र अदिवासी विकास कार्यालयाकडे जमा करुन ते ज्या जातीमध्ये समाविष्ट होत आहेत त्याजातीचे जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्यांअनुषंगाने आपल्या संस्थेतील कार्यरत व सेवानिवृत्त झालेल्या वर्ग अ ते ड कर्मचारी यांची माहिती खालील प्रपत्रात भरुन आजच ईमेल/फॅक्सद्वारे तात्काळ दुपारी ५-३० वाजेपर्यत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

| संवर्ग | दि. १५ जून १९९५ पुर्वी अनु. जमातीच्या प्रमाणपत्रा अधारे नियुक्त झालेल्या एकुण अधिकारी/ कर्मचारी यांची संख्या | दि. १५ जून १९९५ पुर्वी नियुक्त झालेल्या व जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या कर्मचा-यांची संख्या | अनु. जमातीचा दावा सोडल्यामुळे मुळ अनु. जमातीचे प्रमाणपत्र संस्थेत अथवा अदिवासी कार्यालयाकडे जमा केलेल्या कर्मचा-यांची संख्या | |
|---|---|---|---|---|
| | | | **सेवेतील कर्मचारी** | **सेवानिवृत्त कर्मचारी** |
| गट-अ व ब | | | | |
| गट- क | | | | |
| गट-ड | | | | |
| एकूण | | | | |

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रतः या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी